Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

३१/२०२५

विषय : - ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम. व एम.एस्सी.(गणित) अभ्यासक्रमास शिक्षण शुल्कामध्ये (**Tuition Fee**) सवलतीबाबत.

सर्व संबधिताना कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत **ऑनलाईन एम.बी.ए., एम.कॉम. व एम.एस्सी.(गणित)** हे अभ्यासक्रम सुरु करण्यात आलेले आहेत. सदर अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जुलै २०२५ सेशनचे प्रवेश अर्ज दि. ३१.०८.२०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. सदर प्रवेशाची मुदत ही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सुधारित होणार आहे.

विद्यापीठातील अधिकार मंडळाने सदर अभ्यासक्रमास प्रवेशित होणाऱ्या विद्यापीठातील आजी/माजी कर्मचारी, त्यांचे पाल्य तसेच शिवाजी विद्यापीठाचे पदवीधर विद्यार्थी, महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, तसेच विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यापीठ व महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी व त्यांचे पाल्य यांना यातील एक किंवा एकापेक्षा अधिक गटात समावेश असणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षण शुल्कामध्ये (Tuition Fee) एकत्रित १० टक्के सवलत देणेस यापूर्वी मान्यता दिलेली आहे. तसेच नव्याने इतर विविध गटात बसणाऱ्या विद्यार्थ्यांनाही शिक्षण शुल्कामध्ये (**Tuition Fee**) सवलती देण्यास मान्यता दिलेली आहे.

सोबत यासंदर्भातील सवलतीबाबतच्या माहिती तक्ता सोबत जोडला असून त्याअनुषंगाने इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अभ्यासक्रमास प्रवेश घेवून सवलतीचा लाभ घ्यावा. या अभ्यासक्रमांच्या सूचना व सविस्तर माहितीचा तपशील विद्यापीठाच्या https://online.unishivaji.ac.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच संबंधित विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश अर्ज ऑनलाईन पध्दतीने https://sukapps.unishivaji.ac.in/pgentrance/#/login या लिंकवर भरावा.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/1781
दि. 29 AUG 2025
प्रति,

१) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, संचालक, यांचे कार्यालयास,
२) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, रेक्टर व सेवक
३) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य संचालक
४) जनसंपर्क कार्यालय प्रसिध्दीसाठी
५) इंटरनेट विभाग सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.

**विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी, सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

## ३१ /२०२५

## ऑनलाइन एम.बी.ए., एम.कॉम. व एम.एस्सी.(गणित) या अभ्यासक्रमांसाठी विविध गटातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कामध्ये (Tuition Fee) देण्यात येणाऱ्या सवलतीचा माहिती तक्ता

| अ.क्र | शैक्षणिक शुल्कामध्ये टक्केवारीत सवलत | सवलत तपशील |
|---|---|---|
| १ | ५ टक्के सवलत | दोन वर्षाचे शैक्षणिक शुल्क एकाचवेळी भरल्यास सदर सवलत ही देय रक्कम (एकूण रक्कम उपरोक्त विशेष सवलत वजा करून राहिलेली देय रक्कम) वर लागू राहील. |
| २ | १० टक्के सवलत | १. कोल्हापूर नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या सदस्य बँकांचे कर्मचारी<br>२. भारतीय संरक्षण सेवेतील अधिकारी व कर्मचारी<br>३. महाराष्ट्र-कर्नाटक सिमाभागातील विद्यार्थी .<br>अ. मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५ गावातीलच रहिवाशी असल्याबाबतचा त्यांच्या १५ वर्षे वास्तव्याचा सक्षम प्राधिकारी यांचा विहीत नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहील.<br>ब. सीमाभागातील गावातील पुढील विद्याथ्यांना प्राधान्य मिळले.<br>१० वी पर्यंत ज्यांचे शिक्षण मराठीत झाले आहे.<br>ज्यांचा १० वी ला मराठी विषय आहे.<br>४ शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्था यांचा शिवाजी विद्यापीठाशी सामंजस्य करार झालेले त्यांचे कार्यालयातील कर्मचारी<br>उपरोक्त अ.क्र. १ ते ४ मध्ये नमूद केलेप्रमाणे एक किंवा एकापेक्षा अधिक गटात समाविष्ट असणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षण शुल्कामध्ये एकत्रित १० टक्के सवलत |
| ३ | २५ टक्के सवलत | राज्यस्तरीय आणि झोन/झोनल खेळाडू |
| ४ | ४० टक्के सवलत | राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू |
| ५ | ५० टक्के सवलत | आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू |

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/1781
दि. 29 AUG 2025